

Rayat Shikshan Sanstha's

# SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA, SATARA (MH)



**B.A., B.Com., M.Com., B.C.A. & B.Voc. in Nursing**

**Reaccredited at B++ Grade by NAAC, Bengaluru. CGPA : 2.80**

KARMAVEER SAMADHI PARISAR, RAVIWAR PETH, POWAI NAKA, SATARA. PIN NO.415001.
PH: (02162) 231705, Email: savitribai_phule@yahoo.com Website: www.spmmedu.in

PROSPECTUS




GIRLS' HOSTEL

## विद्यार्थिनी वसतिगृहाचे नियम :

### प्रवेशाबाबतचे नियम :

१. वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनीने छापील फॉर्ममध्येच अर्ज करावा.
२. अर्जावर आयडेंटिटी साईजचा फोटो लावणे आवश्यक आहे.
३. सातारा शहरातील विद्यार्थिनींना प्रवेश दिला जाणार नाही.
४. अर्ज भरताना वसतिगृहाची वार्षिक फी अर्जाबरोबर भरली पाहिजे.

### सूचना :

५. प्रवेश घेतेवेळीच फी भरल्यास १५,००० /- रु. फी भरावी लागेल. जर दोन टप्प्यात फी भरावयाची असेल तर पहिला टप्पा प्रवेश घेतेवेळी ८०००/- रु. व ऑक्टोबर महिन्यात ७५००/-रु. भरावे लागतील.
६. प्रवेश अर्ज देण्यापूर्वी अगर प्रवेश दिल्यानंतर एखाद्या विद्यार्थिनीस संसर्गजन्य रोग असल्याचे आढळून आल्यास तिला प्रवेश नाकारण्यात येईल, अथवा दिला असल्यास रद्द केला जाईल.
७. वसतिगृहाचे प्रवेश समितीने दिलेला निर्णय अंतिम समजला जाईल. दि. ३० एप्रिल या तारखेला सत्र समाप्त होईल.
८. सत्र समाप्तीनंतर ज्यांच्या परीक्षा असतील त्यांची फी गेस्ट गर्ल प्रमाणे आकारण्यात येईल.
९. वार्षिक परीक्षा झाल्यानंतर दोन दिवसांचे आत वसतिगृहातील विद्यार्थिनीने वसतिगृहाचे सर्व साहित्य व आपली खोली मा. रेक्टर यांचे ताब्यात खाली करुन द्यावी..

### महत्वाच्या सूचना :

१. वसतिगृहामध्ये मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे.
२. वसतिगृहामधील विद्यार्थिनींना थेअरी व प्रॅक्टीकल पिरियडला नियमित उपस्थित असणे आवश्यक आहे.
३. वसतिगृहाच्या नियमाबाहेर कोणत्याही शिकवणी वर्गास जाता येणार नाही.
४. नियमबाह्य व गैरवर्तन तसेच कॉलेजच्या व वसतिगृहाच्या शिस्तीस बाधा आणणारे वर्तन करणाऱ्या विद्यार्थिनीस शासन केले जाईल. त्याबाबत कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. सदर वर्तन हे रॅगिंग म्हणून समजले जाईल व रॅगिंग कायदा १९९९ नुसार गुन्हा समजला जाईल.

### परगावी अथवा बाहेर जाणे-येणेबाबत :

१. रेक्टरच्या पूर्व परवानगीशिवाय वसतिगृह सोडून बाहेर जाता येणार नाही. पूर्व परवानगीशिवाय गैरहजर राहिलेली विद्यार्थिनी दंडास पात्र ठरेल किंवा वसतिगृहामधील प्रवेश रद्द केला जाईल.
२. परगावी अथवा स्थानिक ठिकाणी जाताना येताना संबंधित रजिस्टरमध्ये नोंद करावी लागेल. गेटच्या बाहेर गेल्यास संपूर्ण जबाबदारी विद्यार्थीनीची राहील.
३. दोन अथवा त्यापेक्षा जास्त दिवस घरी जाणार असल्यास आपल्या विद्यालय व महाविद्यालयातील विभाग प्रमुखाची परवानगी घेऊनच रेक्टरना लेखी अर्ज द्यावा. तसेच वाढीव रजा पाहिजे असल्यास पुन्हा अर्ज पाठवून दयावा
४. महाविद्यालयीन सहलीला जाताना महाविद्यालयाचे अथवा विषयप्रमुखाचे सहलीसंबंधी पाठवून पत्र सादर करावे लागेल.
५. खोली बाहेर जाताना खोलीला कुलुप लावावे व चावी बोर्डाला ठेवावी.

### वेळे संबंधी नियम:

१. एखाद्या दिवशी बाहेर गेल्यास सायंकाळी ६:०० वाजण्यापूर्वी वसतिगृहात हजर रहावे. सायंकाळी ६:०० वाजता गेटला कुलूप लावण्यात येईल याची नोंद घ्यावी व यानंतर आल्यास वसतिगृहात प्रवेश दिला जाणार नाही, अशा विद्यार्थिनींची माहिती पालकांना कळविली जाईल.

| फी तपशील | वार्षिक रक्कम |
|---|---|
| १. होस्टेल फी | १२०००.०० |
| २. जिम व हेल्थ स्किम फी | १०००.०० |
| ३. इतर फी | ५००.०० |
| ४. वीज आणि गरम पाणी | १०००.०० |
| ५. होस्टेल मेंटेनन्स | ५००.०० |
| **एकूण फी** | **१५,०००/-** |

वसतिगृह प्रवेश एक वर्षासाठी असेल, कोणत्याही परिस्थितीत वसतिगृह मध्येच सोडता येणार नाही.

२. गेट प्रत्येक वेळी जाता येता बंद करावे.
३. आई व वडील यांच्याबरोबर फोनवर बोलण्याची वेळ सायं.६.३० ते ६.४५ अंशी राहील..
४) संध्याकाळी भोजनगृहात जेवणाची वेळ ६.४५ ते ७.३० त्यानंतर अभ्यासाची वेळ असेल याची नोंद घ्यावी.

### स्वच्छतेसंबंधी सूचना :

१. स्वत:ची खोली, वसतिगृह आवार, प्रसाधनगृहे व भोजनकक्षाची स्वच्छता राखण्याची जबाबदारी विद्यार्थिनींवर राहिल. दर रविवारी १ ते १।। तास भोवतालचा परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थिनीनी द्यावयाचा आहे. खोलीत अस्वच्छता दिसून आल्यास रुममधील सर्वांकडून दंड घेतला जाईल.
२. वसतिगृहतील वातावरण नेहमी प्रसन्न, स्वच्छ व अभ्यासास पोषक राहील याची दक्षता घ्यावी.
३. आठवड्यातून दोन वेळा आपली रूम व बाहेरील भाग स्वच्छ करावा.
४. डस्टबिनमध्ये फक्त सुका कचरा टाकावा.
५. आपले ताट नियमितपणे स्वच्छ करावे. अन्न वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी, परंतु जर अन्न उरलेच तर मेसमधील डस्टबिनमध्येच टाकावे.

### आचरण :

१. खोलीत शांतता राखावी, इतरांच्या अभ्यासात व्यत्यय आणू नये.
२. रेक्टर अथवा सेक्रेटरी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल.
३. सर्वांशी खेळीमेळीने, स्नेहाने, मैत्रीने वागावे, वडीलधाऱ्या माणसांशी विनम्रपणे वागावे.
४. रेडिओ, टेपरेकॉर्डर्स व इतर कोणतीही वाद्य खोलीत वाजविण्यास सक्त मनाई आहे.
५. विद्यार्थिनीची महाविद्यालयातील दैनंदिन उपस्थिती, वर्तणूक, परीक्षा, हजेरी इ. पाहूनच पुढील सत्रात वसतिगृहात ठेवणे अगर न ठेवणे याचा विचार केला जाईल.
६. पाणी व वीज संबंधीत सूचना यांचे काटेकोरपणे पालन करावे, त्यासंबंधी तक्रार असल्यास रेक्टरकडे लेखी तक्रार द्यावी. तसेच प्रसाधन गृहातील दिवे कामापुरते वापरावेत.

### नातेवाईकसंबंधी सूचना :

१. आई, वडील, भाऊ, बहीण यांनाच भेटू दिले जाईल.
२. जे नातेवाईक भेटण्यास येण्याची शक्यता राहील अशांची नावे रेक्टरना लेखी स्वरुपात कळवावी लागतील, त्या व्यतिरिक्त कोणासही भेटू दिले जाणार नाही.
३. पालकांना आपल्या पाल्यास बुधवार आणि रविवार सकाळी ११:०० ते संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत गेस्टरुममध्येच भेटावे, बाहेर किंवा कॉलेजमध्ये भेटता येणार नाही.

### अंतर्गत व्यवस्था :

१. वसतिगृहाचे नेमलेले रेक्टर वसतिगृहातील संपूर्ण अंतर्गत व्यवस्था पाहतील व करण्याचा सर्व अधिकार राहील. त्यांना अंतर्गत देखरेख करण्याचा सर्व अधिकार राहील.
२. वसतिगृह समितीचे धोरण आणि आदेशानुसार रेक्टर विद्यार्थिनींवर शिस्त, अभ्यास, खेळ व सर्वसाधारण वर्तणूक याबाबत नियंत्रण आणि देखरेख ठेवतील.
३. वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींनी वसतिगृहाच्या होणाऱ्या सर्व समारंभास उपस्थित राहिले पाहिजे. १५ ऑगस्ट, २२ सप्टेंबर, २६ जानेवारी या दिवशीच्या कार्यक्रमांना कोणासही गैरहजर राहता येणार नाही.

### निवासासंबंधी सूचना :

१. अधिकृतपणे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींनाच फक्त राहता येईल. मैत्रिणी व नातेवाईक यांना वसतिगृहात ठेवून घेता येणार नाही.
२. वैयक्तिक मौल्यवान वस्तू, पैसे, वह्या-पुस्तके अथवा इतर कोणत्याही वस्तू विद्यार्थिनींनी स्वत:च्या जबाबदारीवर सांभाळावयाच्या आहेत. कोणत्याही वस्तूची चोरी अथवा हरवणे अशा प्रकारास वसतिगृह जबाबदार राहणार नाही.

## Hostel Facilities:

1) Solar System for Hot Water Facility (In Summer and Winter Season)
2) Gas Geyser for Hot Water Facility (In Rainy Season)
3) Water Purify and Cooling Facility
5) News Papers
6) Television Facility
7) Mess Facility
8) Bio gas System
9) Gym/Yoga
10) Reading Room
11) NRC

## Controlling and Discipline System:

1) Admission Form
2) Leave Application
3) Incoming and Outgoing time register
4) Daily Prayer
5) Daily Attendance
6) C.C. T.V.

## Other Activities :

1) Rangoli Competition
2) Quiz Competition
3) Dance Competition
4) Elocution Competition
5) Celebration of Navratra Festival
6) Celebration of Kojagiri Pornima
7) Celebration of Birthday

३. वसतिगृहातील व रुममधील सामानाची नासधूस करु नये. नुकसान केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थिनीवर राहील व तिला दंड अथवा वस्तूची भरपाई द्यावी लागेल.
४. खोलीमध्ये नसताना दिवे चालू ठेवू नये, झोपण्यापूर्वी दिवे घालवावे.
५. रेक्टरच्या परवानगीशिवाय विद्यार्थिनींनी आपली खोली परस्पर बदल करू नयेत.

**मेससंबंधी सूचना :**

१. मेसचे बील प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत भरावे लागेल.
२. महिन्यातील फक्त १० दिवसच सलग खाडे पकडले जातील.
३. एखाद्या विद्यार्थिनीला जास्त दिवस घरी जायचे असेल त्यासंदर्भात मेस चालकाला एक अर्ज करुन द्यावा लागेल.
४. एखाद्या मुलीचे १ महिन्यात १० दिवस किंवा १० दिवसापेक्षा कमी जेवणाचे दिवस भरत असतील तर तिला डब्याप्रमाणे पैसे द्यावे लागतील.

**जिम व हेल्थ स्किम :**

विद्यार्थिनींचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी महाविद्यालयाच्या वसतिगृहासाठी अद्यावत जिमची सोय उपलब्ध करुन देण्यात आली असून सदर जिममध्ये आधुनिक प्रकारची व्यायामाची साधने ठेवण्यात आली आहेत. इच्छूक विद्यार्थिनींना या संदर्भात व्यायाम साधनांचा तज्ज्ञांकडून परिचय करुन दिला जातो व नंतर वर्षभर विद्यार्थिनीस सदर जिमचा वापर करता येतो.

वर्षभरासाठी सकाळी ६:०० ते ७:०० या वेळेत प्राणायाम व योगासनांचे प्रशिक्षक विद्यार्थिनींना उपलब्ध करुन देण्यात येतील याचा फायदा विद्यार्थिनींनी करून घेणे आवश्यक आहे. तसेच आरोग्यासंदर्भात तज्ञ डॉक्टरांची व्याख्याने विद्यार्थिनींसाठी आयोजित केली जातात. या योजने अंतर्गत अल्पदरात विद्यार्थिनीस वैद्यकिय सेवा स्थानिक डॉक्टरांकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

**विद्यार्थिनीचे नाव :** ..............................

**वर्ग :** .................... **रुम नंबर :** ....................

## (अ) प्रथम सत्रात प्रवेशाच्यावेळी भरलेल्या फी चा तपशील

| अ. नं. | फी चा प्रकार | भरलेली रक्कम रु. | पावती क्र. दिनांक | विद्यार्थिनीची सही | कार्यालय गोल सिल व सही |
|---|---|---|---|---|---|
| १ | होस्टेल फी | | | | |
| २ | हेल्थ स्किम फी | | | | |
| ३ | इतर फी | | | | |
| ४ | वीज व गरम पाणी | | | | |
| ५ | होस्टेल मेन्टेनंन्स | | | | |
| | **एकूण रक्कम रुपये** | | | | |

## (ब) दुसऱ्या सत्रात विद्यार्थिनीने उर्वरित फी भरावयाचा तपशील

| अ. नं. | फी चा प्रकार | भरलेली रक्कम रु. | फी भरण्यासंदर्भात विद्यार्थिनींचे नियोजन | |
|---|---|---|---|---|
| १ | होस्टेल फी | | उर्वरित फी चा दुसरा हप्ता मी दिनांक / / २० रोजी भरीन अशी हमी रेक्टर यांचे समवेत देत आहे. | |
| २ | हेल्थ स्किम फी | | | |
| ३ | इतर फी | | | |
| ४ | वीज व गरम पाणी | | | |
| ५ | होस्टेल मेन्टेनंन्स | | | |
| **एकूण भरावयाची फी रुपये** | | | विद्यार्थिनी सही / दिनांक | रेक्टर सही / शिक्का दि. |

## (क) नियोजनाप्रमाणे विद्यार्थिनीने उर्वरित फी भरली त्याचा तपशील

| अ. नं. | फी चा प्रकार | भरलेली रक्कम रु. | पावती क्र. दिनांक | विद्यार्थिनीची सही | कार्यालय गोल सिल व सही |
|---|---|---|---|---|---|
| १ | होस्टेल फी | | | रेक्टर सही/ शिक्का | विद्यार्थिनीने संपूर्ण फी भरली आहे / नाही. तिचे कडून रु. .................. फी येणे आहे / नाही |
| २ | हेल्थ स्किम फी | | | | |
| ३ | इतर फी | | | | |
| ४ | वीज व गरम पाणी | | | | |
| ५ | होस्टेल मेन्टेनंन्स | | | | |
| **वरील अ+क नुसार एकूण रु.** | | | | | |

**टिप:**

१. प्रथम प्रवेशाची फी भरुन पावती मिळाल्यावर तक्ता (अ) मधील नोंदी करून त्यावर कॅशिअर कडून गोल शिक्का मारुन सही घ्यावी.
२. प्रथम प्रवेशाच्या पूर्वी उपलब्ध रक्कमेनुसार तक्ता (ब) मधील पुढील फी भरण्याचे नियोजन विद्यार्थिनीने तारखे नुसार द्यावयाचे आहे.
३. तक्ता (क) नुसार फी भरण्यास उशीर झाल्यास विद्यार्थिनीस दंडात्मक कारवाईस समोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.

## विद्यार्थिनींकडून वसतिगृहात / वसतिगृहाबाहेर नियमबाह्य व चुकीचे वर्तन घडल्यास त्याच्या तपशीलवार नोंदी

| दिनांक | नियमबाह्य/चुकिच्या वर्तनाचा तपशील | विद्यार्थिनीचा अभिप्राय व सही | रेक्टरांची सूचना व सही दिनांक | पालकांची सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**टिप:** विद्यार्थिनीकडून चुकीचे वर्तन घडल्यास रेक्टर यांचे समोर, वरील नोंद करुन त्यावर रेक्टर यांची लेखी सूचना व सही घ्यावी त्यानंतर हॅन्डबुक घरी नेऊन त्यावर पालकांची सही आणून रेक्टर व प्राचार्य यांना दाखविणे बंधनकारक राहील.

**विद्यार्थिनी उपस्थिती नियमन - हालचाल कार्ड योजना :**

१. प्रत्येक विद्यार्थिनिला एक वर्षासाठी हालचाल कार्ड दिले जाईल.
२. हालचाल कार्ड हे कॉलेजव्यतिरिक्त बाहेरगावी जाण्यासाठी वापरले जाईल.
३. वसतीगृहामध्ये एकूण तीन बॉक्स भिंतीला लावलेले असतील. त्यातील पहिल्या बॉक्सवर (वसतीगृह) असे लिहले असेल, दुसऱ्या बॉक्सवर (महाविद्यालय) असे लिहले असेल, तर तिसऱ्या बॉक्सरवर (बाहेरगावी) लिहले असेल.
४. प्रथम सर्व वसतीगृहातील मुलींचे कार्ड (वसतीगृह) या बॉक्समध्ये असतील. ज्यावेळेस विद्यार्थिनीला कॉलेजला जायचे असेल त्यावेळेस सदर विद्यार्थिनीने (वसतीगृह) बॉक्समधून आपल्या नावाचे कार्ड काढून (महाविद्यालय) या बॉक्समध्ये टाकावे. व महाविद्यालयातून आल्यानंतर परत ते कार्ड (वसतीगृह) या बॉक्समध्ये टाकावे. तसेच ज्या विद्यार्थिनीला बाहेरगावी जायचे असेल तेव्हा तिने आपल्यानावाचे कार्ड (वसतीगृह) या बॉक्समधून काढून (बाहेरगावी) या बॉक्समध्ये टाकावे. यासाठी रेक्टर कडून लेखी अर्ज घेऊन त्यांची परवानगी आवश्यक आहे. बाहेरगावाहून परत आल्यावर (बाहेरगावी) या बॉक्समधील आपले कार्ड परत (वसतीगृह) या बॉक्समध्ये टाकावे.
५. वरील तीन ही बॉक्स मधील कार्ड सकाळी ८:०० व सायंकाळी ४:०० वाजता मोजले जातील.

# रयतगीत



रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे || धृ ||

कर्मवीरांचे ज्ञानपीठ हे शक्तीपीठही ठरते आहे
शाहूफुल्यांचे समानतेचे तत्व मानसी मुरते आहे
धर्म जातीच्या पार गांधीचे मूल्य मानवी जपतो आहे || १ ||

गरिबांसाठी लेणी मोडून लक्ष्मी वहिनी ठरली आई
'कमवा आणि शिका' मंत्र हा तरुणाईला प्रेरक होई
स्वावलंबी वृत्ती ठेवून ज्ञानसाधना करतो आहे || २ ||

दीन दलितांसाठी आण्णा तुमची झिजली चंदन काया
अनाथ जीवा सदा लाभली मातृहृदयी तुमची माया
शून्यामधल्या नवसृष्टीचा निर्मिक तोही ठरतो आहे || ३ ||

जीवनातील तिमिर जावा प्रबोधनाची पहाट व्हावी
इथे लाभले पंख लेवूनी उंच भरारी नभात घ्यावी
प्रतिभाशाली बहुजनांचा वेलू गगनी चढतो आहे || ४ ||

– कवी विठ्ठल वाघ







## प्रार्थना गीत

### इतनी शक्ति हमें देना दाता

इतनी शक्ति हमें देना दाता, मनका विश्वास कमजोर होना
हम चले नेक रस्ते पे हमसे भूलकर भी कोई भूल हो ना...

दूर अज्ञान के हों अंधेरे, तू हमें ज्ञान की रौशनी दे
हर बुराई से बचे रहें हम जितनी भी दे, भली जिन्दगी दे
बैर हो ना किसी का किसी से, भावना मन मे बदले की हो ना...
हम चले

हम न सोंचे हमें क्या मिला है, हम ये सोचें किया क्या है अर्पण
फूल खुशियों के बांटे सभी को सबका जीवन ही बन जाए मधुबन
अपनी करुणा को जब तू बहा दे करदे पावन हर इक मन का कोना ...
इतनी शक्ति हमें देना दाता, मनका विश्वास कमजोर होना
हम चले नेक रस्ते पे हमसे भूलकर भी कोई भूल हो ना...

"Education through self-help is our motto"
Karmaveer


Rayat Shikshan Sanstha's
**SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA, SATARA**

Karmaveer Samadhi Parisar, Raviwar peth,
Powainaka, Satara : 415 001. Ph :(02162)231705,
Email : savitribai_phule@yahoo.com, Website : www.spmmedu.com


प्रवेश अर्ज किंमत ५०/-

Kalavishkar Graphics. Satara / 9503780628